अंतरी पेटवू ज्ञानज्योत

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

## नृत्य व गायन अभ्यासक्रम

प्रथमवर्ष कला - जुलै, २००० पासून लागू.

व्दितीयवर्ष कला - जुलै, २००१ पासून लागू.

तृतीयवर्ष कला - जुलै, २००२ पासून लागू.

अंतरी पेटवू ज्ञानज्योत

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

## नृत्य व गायन अभ्यासक्रम

**अभ्यासक्रम निश्चित करण्यामागील उद्देश :-**

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात १९९१ पासून फाईन आर्टस डिपार्टमेंट प्रस्तापित होवून त्यामध्ये संगीतादी परफॉर्मिंग आर्टसचा (गायन, वादन व नृत्य) यांचाही समावेश केला आहे, ही अत्यंत स्वागताई घटना आहे.

आपल्या भारतीय अभिजात संगीताची परंपरा जगात अत्यंत श्रेष्ठ प्रकारची आहे व तीला ३०० वर्षाहून अधिक काळाचा इतिहास लाभला आहे. त्यामुळे दिवसेंदिवस अशा कलांचा शास्त्रीय अभ्यास करण्याकडे तरुण वर्गाचा कल कमी होतांना दिसत आहे.

त्यामुळे या पारंपारिक कलांची उत्कर्षावस्था होतांना दिसत नाही. आपल्या देशाचा हा थोर सांस्कृतिक ठेवा व ज्ञान नामशेष होवू नये व पिढ्यांपिढ्या हा वारसा चालत राहावा या सदिच्छेने विद्यापीठीय पातळीसाठी आमची सभा खालीलप्रमाणे अभ्यासक्रम निश्चित करत आहे. बऱ्याच विद्यार्थ्यांचा कल, आवड व त्यांना मिळालेली नैसर्गिक देणगी अशा प्रकारच्या पारंपारिक कलांचे शिक्षण घेण्याच्या दृष्टीने अतिशय अनुकूल असते त्यांच्या ह्या दैवी देणगीला प्रत्यक्षात वाव मिळावा या दृष्टीने असे अभ्यासक्रम विद्यापीठीय स्तरावर राबविले जाणे सुद्धा काळाची गरज आहे. हे सर्व उद्देश आणि हेतू लक्षात घेवून तव्दत् खानदेशातील विद्यार्थी प्रामुख्याने डोळ्यासमोर ठेवून त्यांना सहजपणे अवगत होईल. अशाप्रकारचाच अभ्यासक्रम आम्ही तयार करीत आहोत.

१) **प्रवेश पात्रता :-**

   १) विद्यार्थी कुठल्याही कला शाखेतील असल्यास त्याला प्रवेश घेता येईल.

   २) प्रत्येक विद्यार्थ्याला प्रवेश घेतांना विद्यार्थ्यांच्या आवाजाची व नैसर्गिक देणगीची चाचणी परीक्षा घेवून प्रवेश दिला जाईल.

२) **गुण पद्धती :-**

५० गुण तोंडी व ५० गुण लेखी असे एकुण १०० गुण असतील. तिन्ही वर्षासाठी सामान्य स्तरावर (जनरल) हा विषय राबविला जात आहे.

३) **विद्यार्थी संख्या :-**
विद्यार्थी संख्या १० पर्यंत प्रत्येक तुकडीत असावी, प्रात्यक्षिक शिक्षणाशी संबंध असल्यामुळे यापेक्षा जास्त असू नये.

४) प्रात्यक्षिक ज्ञान मिळविण्यासाठी रोज कमीत कमी एक तासिका याप्रमाणे आठवड्याचे एकुण ६ (सहा) तासिका असाव्यात व त्यातील ५ (पांच) प्रात्यक्षिक ज्ञानसाठी व एक थेअरीसाठी वापरण्यास याव्या.

५) प्रत्येक तुकडीत प्रवेश देतांना मुलगा आणि मुलगी त्यांची स्वरपट्टी (पीच) निसर्गत: बदलत असल्यामुळे त्याच्या शिक्षणासाठी स्वतंत्र तुकड्या (बॅच) असाव्यात.

६) संपूर्ण शैक्षणिक वर्ष कालावधी (वार्षिक परीक्षेच्या आधी) ३ टिटोरियल प्रात्यक्षिकाची व २ लेखीची घेतली जाऊन त्यातील गुणवत्तेप्रमाणे ईन्टरनल मार्क्स देण्यात यावे व वरील मुद्दा क्र. २ मधील प्रत्येकी ५० गुणांपैकी, ट्युटोरीयलसाठी १५-१५ प्रत्येकी मार्क्स धरावे.

७) गायन, वादन व नृत्य यासाठी विद्यार्थ्यांचे शिक्षण तबला व हार्मोनिअम ह्या वाद्यांची साथ संगत आवश्यक आहे. म्हणून तबला वादक व हार्मोनिअम वादक ह्यांची नेमणूक करावी. तसेच संगीत विभागासाठी तंबोरा, संवादिनी (हार्मोनिअम) व तबला जोडी ही वाद्ये असणे आवश्यक आहे. व ही वाद्ये रिपेअर करणे (मेंटेनन्स) दरवर्षी आवश्यक आहे.

कृ.मा.प.

अंतरी पेटवू ज्ञानज्योत

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

## प्रथमवर्ष कला कंठसंगीत अभ्यासक्रम

### सामान्य पेपर

(जुलै, २००० पासून लागू)

एकुण गुण :- १००     अ) प्रात्यक्षिक - ५० गुण.
ब) शास्त्र (थेअरी) - ५० गुण.

**अ) शास्त्र (थेअरी) विभाग :-**

१) व्याख्या :-

संगीत, ध्वनी, नाद, स्वर, सप्तक, वादी, संवादी, अनुवादी, विवादी, वर्ज्यस्वर, राग, आरोह, अवरोह, पकड, अलंकार, स्थाई, अंतरा, संचारी, आभोग, सम, मात्रा, लय, आवर्तन, खाली, दुगुन.

२) रागांच्या जाती व माहिती पं.भातखंडे प्रणित १० थाटांची विस्तृत माहिती.

३) खालील वाद्यांची थोडक्यात माहिती.
१) हार्मोनियम, २) तबला, ३) तानपुरा.

४) क्रियात्मक अभ्यासक्रमातील सर्व रागांची संपुर्ण माहिती व छोटा ख्यालाची स्वरलिपि लिहणे.

५) (अ) संगीतकारांचे चरित्र-
१) पं.विष्णु दिगंबर पलुस्कर, २) पं. वि.ना. भातखंडे
(ब) खालील गीत प्रकारांची माहिती.
१) ख्याल, २) सुगम संगीत, ३) धृपद व धमार, ४) तराणा.

६) आधुनिक काळातील भारतीय संगीत.

**ब) क्रियात्मक (प्रात्यक्षिक) विभाग :-**

१) रागज्ञान

१) भुपाली, (२) दुर्गा, (३) बागेश्री, (४) सारंग, (५) भिमपलास, (६) खमाज.

२० गुण

वरील सर्व रागांचे छोटेख्याल आलाप तानासहित सादर करणे व रागानुरुप अलंकार म्हणणे. कोणत्याही एका रागात बडाख्याल सादर करणे व कोणत्याही एका रागात धृपद किंवा धमार म्हणणे.

२) अभ्यासक्रमातील रागांपैकी कोणत्याही दोन रागांत सरगमगीत व दोन रागात लक्षणगीत (सरगमगीत व लक्षणगीत निरनिराळ्या रागातील असावे). ०५ गुण

३) अभ्यासक्रमातील रागांपैकी कोणत्याही एका रागांत तराणा. ०५ गुण

४) ताल - खालील तालांची संपूर्ण माहिती व तालाची दुगुन १० गुण
१) दादरा, २) झपताल, ३) त्रिताल, ४) एकताल, ५) रुपक, ६) केरवा, ७) चौताल, ८) धमारताल.

५) अ) जनगणमन व वंदेमातरम् ही राष्ट्रगीते गाण्याची क्षमता.
ब) भावगीत किंवा भक्तिगीत सादर करणे.

६) स्वयं शोध शिक्षण :- विद्यार्थ्यांनी स्वत: शोधुन निवड केलेल्या खालील कविंच्या प्रत्येकी एक रचना म्हणून दाखविणे.
१) साने गुरुजी, (२) बहिणाबाई

७) अंतर्गत गुण. १० गुण

अंतरी पेटवू ज्ञानज्योत

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

## व्दितीयवर्ष कक्षा कंठसंगीत अभ्यासक्रम
(सामान्य पेपर)
जून, २००१ पासून लागू
मार्गदर्शक तत्वे

एकूण गुण :- १००    अ) प्रात्यक्षिक - ५०
                    ब) शास्त्र (थेअरी) - ५०

१) आठवड्याला प्रात्यक्षिकाचे ३ तास
(थेअरी) शास्त्रीय माहितीसाठी २ तास.

२) प्रात्यक्षिकासाठी प्रत्येक गटांत ८ विद्यार्थ्यांपेक्षा जास्त संख्या नसावी.

३) आवाजाच्या नैसर्गिक भिन्नतेनुसार प्रात्यक्षिकाच्यावेळी विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वेगवेगळे गट असावेत.

४) प्रात्यक्षिकाची तासिका ४५ मिनिटांची असावी.

५) स्वरलेखनासाठी भातखंडे स्वरलिपिचा उपयोग करावा.

६) प्रात्यक्षिकासाठी रोज तबला साथ असावी.

७) तानपूरा, तबलाजोड आणि संवादिनी ही वाद्ये असावीत.

८) प्रात्यक्षिक परीक्षेत अंतर्गत (Internal) गुण असावेत.

९) शास्त्र (थेअरी) या प्रश्नपत्रिकेत सर्व प्रश्नांना समान अंक असावेत.

### अभ्यासक्रम

**अ) शास्त्र (थेअरी) विभाग :-**

१) स्वर आणि वेळ या दृष्टीने संगीताचे दिवस आणि रात्र (रागांचे समय चक्र) यांची संपूर्ण माहिती.
२) उत्तर भारतीय व दक्षिण भारतीय संगीत पद्धतीचा तुलनात्मक अभ्यास.
३) तानपूऱ्याची सचित्र संपूर्ण माहिती.
४) रंगभूमिवरील गायक कलाकारांचा जीवन इतिहास.
अ) बालगंधर्व (ब) दिनानाथ मंगेशकर, (क) हिराबाई बडोदेकर, (ड) जितेंद्र अभिषेकी.
५) प्राचिन आणि अर्वाचिन मतांनुसार २२ श्रुतींवर शुद्ध स्वरांची स्थापना.
६) गायकांचे गुण दोष.
७) व्याख्या - ठुमरी, टप्पा, होरी.
वाद्यांचे प्रकार - तत, वितत, घन, सुषिर.
८) टिपा - अ) लोक संगीत, (ब) चित्रपट संगीत, (क) निबद्ध व अनिबद्ध.
९) तालांची संपूर्ण माहिती व त्यांची दुप्पट व चौपट झुमरा, तिलवाडा, धमार, चौताल.
१०) अभ्यासक्रमातील रागांच्या गीत प्रकारांचे स्वर लेखन लिहिता येणे (बडाख्याल, छोटाख्याल, लक्षणगीत, ध्रुपद, धमार, तराना).

ब) क्रियात्मक (प्रात्यक्षिक) विभाग :-

१) रागज्ञान -

१) बिहाग, २) केदार, ३) बागेश्री, ४) मालकंस, ५) भैरव, ६) जौनपूरी, ७) तिलककामोद, ८) देस, ९)बहार, १०) पूर्वी.

२० गुण.

1. वरील सर्व रागांची सविस्तर शास्त्रीय माहिती असावी.
2. वरीलपैकी कोणत्याही ४ रागात गायकीसह विलंबीत (बडा ख्याल) ख्याल.
3. विलंबीत ख्यालाचे राग सोडून उर्वरीत ६ रागांचे द्रुतख्याल (छोटा ख्याल) गायकीसह.
4. विलंबीत ख्यालाचे राग सोडून कोणत्याही रागात १ ध्रुपद व १ धमार, दुप्पट व चौपट यांच्यासह गाणे. ०५ गुण.
5. विलंबीत ख्यालाचे राग सोडून उरलेल्या ६ रागांपैकी वेगवेगळ्या रागांत १ तराना, १ लक्षणगीत व १ सरगम गीत गाणे. ०५ गुण.

**टिप :-** विलंबीत आणि द्रुत ख्याल निरनिराळ्या तालात असावेत.

२) तालज्ञान -
झुमरा, तिलवाडा, धमार आणि चौताल.
वरील सर्व तालांची माहिती व सर्व तालांची हातावर दुप्पट करून दाखवणे.

०५ गुण.

३) सुगम संगीतातील किंवा उपशास्त्रीय संगीतातील खालील गीतप्रकार सादर करणे.
नाट्यगीत/ दादरा/ अभंग/ लोकगीत / भक्तिगीत.

०५ गुण.

४) अंतर्गत गुण १० गुण.

--------

५० गुण.

अंतरी पेटवू ज्ञानज्योत

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

## तृतीयवर्ष कला कंठसंगीत अभ्यासक्रम

### सामान्य पेपर

**जुलै, २००१ पासून लागू**

**मार्गदर्शक तत्त्वे**

**एकुण गुण :- १००** **अ) प्रात्यक्षिक - ५० गुण.**
**ब) शास्त्र (थेअरी) - ५० गुण.**

१) आठवड्याला प्रात्यक्षिकाचे ६ तास शास्त्रीय माहितीसाठी २ तास

२) प्रात्यक्षिकासाठी प्रत्येक गटास ८ विद्यार्थ्यांपेक्षा जास्त संख्या नसावी.

३) आवाजाच्या नैसर्गिक भिन्नतेनुसार प्रात्यक्षिकाचे वेळी विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी वेगवेगळे गट असावेत.

४) प्रात्यक्षिकाची तासिका ४५ मिनिटांची असावी.

५) स्वरलेखनासाठी भातखंडे स्वरलिपिचा उपयोग करावा.

६) प्रात्यक्षिकाचेवेळी रोज तबला साथ असावी.

७) तानपुरा, तबलाजोड आणि संवादिनी ही वाद्ये असावीत.

८) प्रात्यक्षिक परीक्षेत अंतर्गत (Internal) गुण असावेत.

९) शास्त्र (थेअरी) या प्रश्नपत्रिकेत सर्व प्रश्नांना समान अंक असावेत.

**अभ्यासक्रम**

**अ) शास्त्र (थेअरी) विभाग :-**

अ) १) खालील दिलेल्या विषयांवर आपले विचार मांडणे.
१) संगीत साधनेचे महत्व, २) आधुनिक मैफलीचे स्वरुप, ३) संगीतातील प्रसार माध्यमे, ४) चित्रपट संगीताची लोकप्रियता.

२) प्राचीन गीत प्रकारांची ओळख व माहिती.
१) प्रबन्ध, २) जाति.

३) अभ्यासक्रमातील समप्रकृतिक रागांचे तुलनात्मक अध्ययन.

४) रागाच्या प्रमुख स्वरसमुहावरुन राग ओळखणे.

५) अभ्यासक्रमातील रागांच्या गीतप्रकारांचे स्वरलेखन ( Notation ) लिहिणे (भातखंडे पद्धति)

६) तानपुऱ्यातून उत्पन्न होणारे सहाय्यक नाद.

७) रागवर्गीकरणाच्या पद्धती -
१) राग रागिणी पद्धती, २) थाट पद्धती, ३) रागांग पद्धती.

८) टीपा -

१) आविर्भाव - तिरोभाव, २) अल्पत्व - बहुत्व, ३) स्थाई - आरोही-अवरोही वर्ण, ४) शुद्धराग, मिश्र राग व संकीर्ण राग.

९) अभ्यासक्रमातील तालांची दुप्पट, तिप्पट व चौपट लिहिता येणे.

ब) क्रियात्मक (प्रात्यक्षिक) विभाग :-

१) रागज्ञान -

१) छायानट, २) हमीर, ३) कामोद, ४) बसन्त, ५) चन्द्रकंस, ६) देशकार, ७) बिभास, ८) मारवा, ९) मुलतानी, १०) हिंडोल.

अ) वरील सर्व रागांची सविस्तर शास्त्रीय माहिती असावी.

ब) वरील रागांतील कोणत्याही चार रागांत गायकीसह बडा ख्याल (विलंबीत) गाता येणे.

क) विलंबीत ख्यालाचे राग सोडून उर्वरित सहा रागांचे द्रुत ख्याल (छोटे ख्याल) गायकीसह गाता येणे. १५

ड) विलंबीत ख्यालाचे राग सोडून कोणत्याही रागांत एक धृपद व एक धमार, दुप्पट, तिप्पट या चौपटीसह गाणे. ०५

इ) वरीलपैकी कोणत्याही दोन वेगवेगळ्या रागांत एक चतरंग किंवा त्रिवट गाता येणे. ०५

टिप :- वरील सर्व गीतप्रकार निरनिराळ्या तालांत असावे.

२) तालज्ञान -

अ) आडाचौताल, दीपचंदी, पंजाबी, अध्धा व मागील वर्षाच्या सर्व तालांची दुप्पट व चौपट करता येणे. ०५

३) अ) गाऊन दाखविलेले राग ओळखता येणे.
ब) उपशास्त्रीय संगीत - खालील रागांत ठुमरी गाता येणे (कोणत्याही एका रागांत).

१) देस, २) पिलु, ३) मांड, ४) तिलंग, ५) खमाज, ६) भैरवी. १०

४) अंतर्गत गुण १०

---

५०

अंतरी पेटवू ज्ञानज्योत

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

प्रथमवर्ष कला कथ्थक, नृत्य अभ्यासक्रम

सामान्य पेपर

जुलै, २००० पासून लागू.

**सामान्य नियम नृत्य :-**

१) प्रत्येक दिवशी नृत्य विषयाचा १ तास असावा, १ तास ४५ मिनिटांचा असावा.

२) प्रत्येक आठवड्यांत क्रियात्मक (प्रॅक्टीकल) अभ्यासाचे ४ तास आणि शास्त्र (थेअरी) अभ्यासाचे २ तास असावेत.

३) प्रात्यक्षिकाच्या तासांत,प्रत्येक विद्यार्थ्याने पायांत घुंगरु बांधणे आवश्यक असावे.

४) प्रात्यक्षिकाच्या वर्गांत विद्यार्थ्यांची संख्या एका वेळी ८ पेक्षा जास्त असू नये.

५) लेखी परीक्षेत नृत्याचे बोल ताललिपींत लिहिण्याचा प्रश्न सोडविणे आवश्यक असावे.

६) क्रियात्मक परीक्षेत तबल्याबरोबर नृत्य करणे आवश्यक असावे.

७) नृत्य विभागात तबला जोडी, हारमोनियम आणि घुंगरु उपलब्ध असणे आवश्यक आहे.

## अभ्यासक्रम

**अ) शास्त्र (थेअरी) विभाग :-**

१) भारतीय नृत्यकलेच्या अध्यात्मिक आणि धार्मिक पार्श्वभूमीची तोंड ओळख.

२) शास्त्रीय नृत्य, लोकनृत्य आणि इतर नृत्य प्रकार यांची सामान्य माहिती. प्रमुख शास्त्रीय नृत्य पद्धतींची नांवे आणि त्यांचे भारतांतील उगमस्थान यांची माहिती.

३) लय आणि लयीचे प्रकार (विलंबित, मध्य, द्रुत) यांची सामान्य माहिती, ताल लिपीतील चिन्हांचा परिचय, ताल आणि त्याचे घटक (मात्रा, सम, टाळी, काल, विभाग) आणि लहेरा (नगमा) यांची सामान्य माहिती.

४) नृत्यप्रस्तुतीसाठी आवश्यक असणारे सहाय्यक घटक (रंगभूषा, वेषभूषा, मंचसज्जा आणि वाद्यवृंद) यांची सामान्य माहिती.

५) कथ्थक शैलीचे प्रमुख घटक (तोडे, गत, तत्कार) यांची सामान्य माहिती.

**ब) क्रियात्मक (प्रात्यक्षिक) विभाग :-**

१) २ अथवा ४ ओळींची ईशवंदना करणे.

२) त्रिताल ठेक्याच्या एकपट, दुप्पट आणि चौपटींत तत्कार करणे.

३) त्रितालाच्या ठेक्याबरोबर ५ हस्तक आणि ५ प्रारंभिक तोडे करणे.

४) २ गत (निकास, घुंगट).

५) हातावर मात्रा मोजून त्रितालाची मात्रा आणि ठेक्यामध्ये एकपट, दुप्पट, चौपट करणे.

६) दादरा आणि केरवा तालाच्या मात्रा आणि ठेका हाताने ताल देऊन म्हणणे.

अंतरी पेटवू ज्ञानज्योत

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

द्वितीयवर्ष कथक, नृत्य अभ्यासक्रम

सामान्य पेपर

जुलै, २००१ पासून लागू.

अ) शास्त्र (थेअरी) विभाग - ५० गुण.

१). खालील संज्ञांची सोदाहरण व्याख्या.
१) आमद, २) तोडा, ३) परन, ४) चक्रदार, ५) कवित, ६) तत्कार, ७) तिहाई, ८) सलामी, ९) लास्य, १०) तांडव.
२) अभिनय दर्पणांतील असंयुत हस्तमुद्रांच्या व्याख्या आणि उपयोग.
३) अभिनय दर्पणांतील शिरोभेदांच्या व्याख्या आणि उपयोग.
४) कथक शैलीच्या लखनौ, जयपूर, बनारस आणि रायगड या घराण्यांची सामान्य माहिती आणि कोणत्याही एका घराण्याच्या एका कलाकाराचे चरित्र.
५) खालील विषयांवर निबंध-
१) नृत्यकलेत घुंगरांचे महत्व.
२) भारतीय नृत्यकलेची लोकप्रियता.
३) नृत्यकला आणि शरीरस्वास्थ.

६) प्रात्यक्षिक विभागांत शिकलेल्या सर्व तालांची एकपट, दुप्पट, चौपट आणि सर्व प्रकाराचे बोल (आमद, परन, चक्रदार, कवित्, इ.) लिपिबद्ध करणे.

ब) क्रियात्मक (प्रात्यक्षिक) विभाग-५० गुण.

१) त्रितालांत थाट, २ आमद, २ तोडे, ३ परन, २ चक्रदार बोल, २ कवित्, २ तिहाइयाँ.

२) झपतालांत, १ आमद, २ तोडे, २ परन, १ चक्रदार, १ कवित्, १ तिहाई.

३) एकतालांत, १ आमद, २ तोडे, २ परन, १ चक्रदार, १ कवित्, १ तिहाई.

४) गत - मटकी बासरी, पनिहारी, पूजा.

५) मीराबाई, तुलसीदास, सूरदास यांच्या कोणत्याही एका भजनावर भाव प्रदर्शन करणे.

६) त्रितालांत तत्काराचे प्रस्तार आणि बेदम व दमदार तिहाई करणे.

अंतरी पेटवू ज्ञानज्योत

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

## तृतीयवर्ष कला कथक नृत्य अभ्यासक्रम

### सामान्य पेपर

### जुलै, २००२ पासून लागू.

**अ) शास्त्र (थेअरी) विभाग - ५० गुण.**

१) खालील संज्ञांच्या व्याख्या-

१) अभिनय आणि त्याचे प्रकार (आंगिक वाचिक आहार्य व सात्विक).

२) नाट्य, नृत्य आणि नृत्त.

३) ठुमरी, तराणा, त्रिवट, चतरंग.

२) प्रात्यक्षिक विभागांत शिकलेल्या तालांची ३ पट लिपिबद्ध करणे.

३) अभिनय दर्पणांतील संयुत मुद्रांच्या व्याख्या व उपयोग.

४) अभिनय दर्पणांतील दृष्टीभेद आणि ग्रीवाभेद यांच्या व्याख्या व उपयोग.

५) लखनौ, जयपूर, बनारस आणि रायगड या प्रत्येक घराण्याच्या कोणत्याही एक कलाकाराचे चरित्र आणि त्यांची नृत्यक्षेत्रांतील विशेष कामगिरी.

६) रस म्हणजे काय, रसनिष्पत्ती कशी होते रस किती आणि कोणते आहेत याची सामान्य माहिती.

७) खालील विषयावर निबन्ध.

१) नृत्य कलेचा संगीत आणि साहित्य कलेशी संबंध.

२) टेलिव्हिजनच्याव्दारे नृत्यकलेचा प्रसार.

३) नृत्यकार्यक्रमांतून सौंदर्यानुभूति.

**ब) क्रियात्मक (प्रात्यक्षिक) विभाग :-**

१) रुपक, मत्त, (९ मात्रा), रुद्र (११ मात्रा), रास (१३ मात्रा), धमार (१४ मात्रा) यापैकी कोणत्याही ३ तालामध्ये. थाट, १ आमद, ३ तोडे, ३ परन, २ चक्रदार, २ कवित्, २ तिहाइयाँ सादर करणे.

२) राधाकृष्ण छेडछाड, माखनचोरी, होली, गोवर्धनोद्धारण, कालियादमन, मदन दहन यापैकी कोणतेही ३ प्रसंग गतभावांतून दाखवणे.

३) गतभाव किंवा गीतरचने बरोबर कोणतेही २ रस दाखवणे.

४) तत्कारांतून बॉट, चलन, लडी, बेदम, दमदार तिहाईयाँ सादर करणे.

५) भजन, ठुमरी, तराणा, त्रिवट किंवा चतरंग यापैकी कोणत्याही २ रचनांवर नृत्य सादर करणे.

६) सर्व तालांतील निरनिराळ्या बोलांची (आमद, तोडे, परन, चक्रदार, कवित् इ.) हाताने ताल देऊन पढंत करणे.

### संदर्भग्रंथ सूची

**(प्रथम, व्दितीय व तृतीयवर्षाकरिता) (शास्त्र व प्रात्यक्षिक)**


१) क्रमिक पुस्तक मालिका भाग-१ ते ६ - पंडीत भातखंडे.

२) रागविज्ञान - भाग-१ ते ५ - ले. पं.विनायकराव पटवर्धन.

३) संगीतशास्त्र विजयीनी - डॉ. नारायण मंगरूळकर.

४) भारतीय संगीताचा इतिहास - हातरस प्रकाशन.

५) मुक्त संगीत संवाद - गानवर्धन संस्था, पुणे.

६) घरंदाज गायकी - वामनराव देशपांडे.

७) स्वरमयी - डॉ. प्रभा अत्रे.

८) स्वराली - डॉ. प्रभा अत्रे.

९) स्वररंगीनी - श्रीकृष्ण वेडेकर, इंदूर.

१०) आरोही - श्री. शशिकांत तांबे.

११) नादचित्रे - अरविंद मंगरूळकर.

१२) अस्ताई - कै. केशवराव भोळे.

१३) अंतरा - कै. केशवराव भोळे.

१४) अंतरसुगंध - कृ.द.दिक्षित.

१५) षड्जगांधार - कृ.द. दिक्षित.


pat5/dbs/syllab/bfa2000